सत्यमेव जयते

लोकहितार्थ सत्यनिष्ठा
Dedicated to Truth in Public Interest

# भागधारक च्या उत्तम सेवा देण्यासाठी उपक्रम



प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)–१ कार्यालय, महाराष्ट्र

# अनुक्रमणिका


- प्रधान महालेखापालांच्या डेस्कवरून
- पेन्शन आणि सामान्य भविष्य निर्वाह निधी संवाद
- पेन्शन आणि सामान्य भविष्य निर्वाह निधी सेवा पत्र
- व्हॉइस मेल सेवा
- टोल फ्री क्रमांक
- ऑनलाइन हेल्पडेस्क
- माहितीचे व्हिडिओ
- ई-पीपीओ
- पेन्शन कार्यशाळा आणि अदालत

# प्रधान महालेखापालांच्या डेस्कवरून

प्रिय वाचक,

आम्ही सेवा देत असलेल्या निवृत्तीवेतनधारक आणि सामान्य भविष्य निर्वाह निधी सदस्यांसाठी सार्वजनिक सेवा देण्याचा अनुभव बळकट करण्यासाठी माझ्या कार्यालयाने सुरू केलेल्या विविध उपक्रमांची रूपरेषा देणारी पुस्तिका तुमच्यासोबत शेअर करताना मला आनंद होत आहे.

भारताच्या नियंत्रक आणि महालेखापरिक्षक (डीपीसी) अधिनियम, 1971 च्या तरतुदींनुसार, माझे कार्यालय म्हणजे प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१ कार्यालय, महाराष्ट्र, महाराष्ट्र राज्याचे लेखे संकलित करते आणि वार्षिक विनियोजन आणि वित्त  लेखे तयार करते. आम्ही राज्य सरकारी कर्मचाऱ्यांच्या पेन्शन प्रकरणांच्या अधिकृतता/अंतिमीकरणासाठी देखील जबाबदार आहोत व आमच्या अधिकारक्षेत्रात एक लाखाहून अधिक राज्य सरकारी कर्मचाऱ्यांचे सामान्य भविष्य निर्वाह निधी खाते राखले जाते.

निवृत्त महाराष्ट्र राज्य सरकारी कर्मचारी, ज्यांचे पेन्शन आणि सामान्य भविष्य निर्वाह निधी या हक्कांवर आम्ही प्रक्रिया करतो, त्यांच्यासाठीच्या आदराचे प्रतीक म्हणून, आम्ही नाविन्यपूर्ण सेवा प्रदान करण्यावर लक्ष केंद्रित केले आहे आणि पेन्शनधारकांसाठी व भविष्य निर्वाह निधी सदस्यांसाठी साथीच्या रोगाच्या कठीण काळात सेवांची उपलब्धता सुलभ आणि अधिक सुव्यवस्थित करण्यासाठी अनेक सक्रिय उपाययोजना सुरू केल्या आहेत. हा अतिरिक्त प्रयत्न करण्याची आमची प्रेरणा प्रामुख्याने मानवीय आणि सेवाभिमुख आहे, निवृत्तीवेतनधारकांना माहिती मिळवणे सोपे करणे आणि त्यांना आमच्या कार्यालयात प्रत्यक्ष प्रवास न करता त्यांच्या समस्यांचे निराकरण करण्यात मदत करणे हा हेतु आहे.

**'पेन्शनची सेवा घरापर्यंत'** देण्यासाठी आणि माहिती आणि सेवा वितरण सुलभ करण्यासाठी आमच्या आपल्यापर्यंत पोहोचण्या साठीच्या प्रयत्नाचा एक भाग म्हणून, गेल्या वर्षभरात आम्ही पेन्शन संवाद, पेन्शन/जीपीएफ सेवा पत्र, पेन्शन कार्यशाळा आणि अदालत, नॉलेज चॅनेल व्हिडिओ, व्हॉइसमेल सेवा, टोल फ्री टेलिफोन नंबर आणि एक समर्पित हेल्पडेस्क ईमेल हे उपक्रम सुरु केले आहेत ज्याचे तपशील तुम्हाला या पुस्तिकेत आढळतील. ही पुस्तिका मराठी, इंग्रजी आणि हिंदी भाषांमध्ये उपलब्ध आहे आणि आमच्या कार्यालयाच्या वेबसाइटवरून डाउनलोड केली जाऊ शकते.

आमच्या कार्यालयाची वेबसाइट **(https://cag.gov.in/ae/mumbai/en)** देखील सतत अपडेट केली जाते जेणेकरुन आमच्या आपल्यापर्यंत पोहोचण्यासाठीच्या उपक्रम आणि सुधारणांबद्दल वास्तविक वेळेत माहिती प्रदान करता येईल. आमच्या प्रयत्नांची माहिती अधिक व्यापक होत असल्याने, या उपक्रमांचे राज्य शासनाच्या  विभागातील आमच्या सहकाऱ्यांनी आणि निवृत्ती वेतनधारकांनी कौतुक केले आहे.

मी विशेषत: पेन्शन संवादाकडे तुमचे लक्ष वेधून घेऊ इच्छिते, जे पेन्शनधारकांना त्यांच्या घरच्या आरामात आमच्या अधिकाऱ्यांना व्हिडिओ कॉल सुविधेद्वारे समोरासमोर भेटण्यास मदत करते. पेन्शनधारकांना मदत करण्यासाठी आम्ही समर्पित टोल-फ्री लाईन्स आणि व्हॉइस मेल सेवा देखील उघडली आहे.

कोविड-19 महामारीशी संबंधित सार्वजनिक आरोग्य निर्बंधांमुळे थांबलेल्या पेन्शन अदालत तथा कार्यशाळाही आम्ही पुन्हा सुरू केल्या आहेत. डीडीओना सहाय्य आणि माहिती देण्यासाठी आणि निवृत्तीवेतनधारकांशी संवाद साधण्यासाठी व त्यांच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी यासारखे वैयक्तिक सहभागाचे उपक्रम विविध कोषागारांमध्ये राज्य शासनाच्या विविध विभागांसाठी आयोजित केले जातात.

मी राज्य सरकारी अधिकारी, लेखा आणि कोषागार संचालनालय आणि कोषागार अधिकारी यांची आभारी आहे ज्यांनी आमच्या प्रयत्नांना सतत पाठिंबा दिला आणि आमच्या वैयक्तिक सहभागाच्या उपक्रमांबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी आणि ते सफल बनवण्यासाठी आवश्यक समन्वयासाठी मदत केली.

पेन्शन आणि सामान्य भविष्य निर्वाह निधी बाबत आमचे सेवा वितरण अधिक बळकट कसे करता येईल याविषयी मी तुमच्या प्रतिक्रिया आणि सूचनांचे स्वागत करेन.

हार्दिक शुभेच्छा,

(जया भगत)
प्रधान महालेखापाल


# ऑनलाइन पेन्शन आणि सामान्य भविष्य निर्वाह निधी संवाद

मार्च 2022 पासून, आमच्या कार्यालयाने "पेन्शन संवाद" नावाचा एक ऑनलाइन चर्चा मंच सुरू केला आहे. हा एक ऑनलाइन संवाद उपक्रम आहे, "पेन्शन तुमच्या दारी", ज्याद्वारे निवृत्तीवेतनधारक आणि भविष्य निर्वाह निधी सदस्यांच्या चिंतेच्या विषयांचे, घरच्या आरामात बसून समाधान किंवा निराकरण होऊ शकते.

संवाद हा ऑनलाइन पद्धतीने व्हॉट्सअॅप/झूम व्हॉईस कॉल्स/व्हिडिओ कॉलद्वारे पेन्शनधारक/भविष्य निर्वाह निधी सदस्यांना त्यांनी दिलेल्या मोबाइल नंबरवर प्रत्यक्ष संपर्क करून साधला जातो. निवृत्तीवेतनधारकांच्या तक्रारी किंवा समस्यांचे निराकरण करण्यासाठी आहरण व संवितरण अधिकारी आणि कोषागार अधिकारी कॉलमध्ये जोडले जातात.

पेन्शनधारक आणि भविष्य निर्वाह निधी सदस्यांच्या विचाराधीन समस्यांवर चर्चा केली जाते, त्यावर उपाय शोधले जातात आणि पुढील काही दिवसांत कारवाई केली जाते. हा अखंड आणि सुव्यवस्थित संवाद, ज्यात आमचे कार्यालय घरोघरी पेन्शन आणि भविष्य निर्वाह निधी विषयक सेवा प्रदान करते, खुप प्रशंसला गेला आहे आणि त्यामुळे समस्यांचे त्वरित निराकरण झाले आहे.

हा उपक्रम विशेषतः वृद्ध आणि आजारी निवृत्तीवेतनधारक ज्यांना ट्रेझरी किंवा एजी कार्यालयात जाणे कठीण आहे यासाठी एक उपयुक्त पर्याय असल्याचे दिसून आले आहे. हे पेन्शनधारक आता त्यांच्या सोयीच्या वेळी त्यांच्या घरून आमच्या कार्यालयाशी संवाद साधू शकतात.





# पेन्शन आणि सामान्य भविष्य निर्वाह निधी  सेवा पत्र

पेन्शनधारकांना त्यांच्या तक्रारींचे निराकरण करण्यात मदत करण्यासाठी, आमच्या कार्यालयाने पेन्शन सेवा पत्र आणि भविष्य निर्वाह निधी  सेवा पत्र उपक्रमाद्वारे ड्रॉप बॉक्स सुविधेची यंत्रणा सुरू केली आहे, ज्यामध्ये पेन्शनधारक/ग्राहक त्यांच्या शंका ऑनलाइन ड्रॉप बॉक्स किंवा आमच्या कार्यालयाच्या प्रवेशद्वारावर ठेवलेल्या प्रत्यक्ष ड्रॉप बॉक्सद्वारे सादर करू शकतात. हे महामारीच्या काळात निवृत्तीवेतनधारकांची सुरक्षितता आणि कल्याण सुलभ करते आणि त्यांची सोय देखील करते.




पेन्शन/जीपीएफ सेवा पत्र फॉर्मची दखल घेतली जाते व सर्व विनंत्या, शंका आणि तक्रारींना दूरध्वनी कॉलद्वारे किंवा ईमेलद्वारे वेळेवर प्रतिसाद दिला जातो.

सेवा पत्रे हे समस्यांचे निराकरण करण्याचे एक अतिशय यशस्वी माध्यम आहे आणि त्याद्वारे जनसंपर्क कक्षाच्या विद्यमान ऑफलाइन प्रणाली, जी आधीपासून अस्तित्वात आहे, त्यामध्ये सेवा वितरणाचा आणखी एक स्तर जोडला गेला आहे.

पेन्शन/भविष्य निर्वाह निधी  सेवा पत्रांना पेन्शनधारक आणि भविष्य निर्वाह निधी  सदस्यांकडून चांगला प्रतिसाद मिळाला आहे.



# व्हॉईस-मेल सेवा

आमच्या कार्यालयाने व्हॉईस-मेल सेवा सुरू केली आहे, ज्याद्वारे पेन्शनधारक/भविष्य निर्वाह निधी सदस्य **020-71177775** या व्हॉईस मेल क्रमांकावर कॉल करून त्यांच्या विनंत्या नोंदवून 24/7 पेन्शन संवादासाठी नोंदणी करू शकतात. आवश्यक असल्यास, आमच्या कार्यालयातील कर्मचारी रेकॉर्ड केलेल्या विनंतीवर पुढील स्पष्टीकरणासाठी नेहमी पेन्शनधारकाला परत कॉल करतात.

# टोल फ्री क्रमांक

आमच्या कार्यालयाने एक टोल फ्री क्रमांक सेवा देखील सुरू केली आहे ज्याद्वारे पेन्शनधारक/भविष्य निर्वाह निधी  सदस्य पेन्शन संवादात नोंदणी करण्यासाठी टोल फ्री क्रमांक **1800-2200-14** वर कॉल करू शकतात आणि कोणतीही मदत/माहिती मागु शकतात. पेन्शनधारक आमच्या अधिकाऱ्यांशी थेट बोलू शकतात आणि त्यांना भेडसावणाऱ्या पेन्शनशी संबंधित कोणत्याही समस्यांवर तोडगा काढू शकतात.

**Call our office Voice Mail Service or Toll Free Number given below to Register for 'PENSION SAMVAAD'**

| | |
|---|---|
|  | **020 7117 7775**<br>24 x 7 |
|  | **1800 2200 14**<br>Monday to Friday 11 AM to 5 PM |

**Officers from the office of the Pr. Accountant General (A&E)-I, Maharashtra, Mumbai will contact you in reply within 2 working days from the mobile number 85910 85243**

# ऑनलाइन हेल्पडेस्क

helpdesk.mh1.ae@cag.gov.in या ईमेल आयडी वर ऑनलाइन हेल्पडेस्क सुविधा सुरू करण्यात आली आहे.

हेल्पडेस्कचा उपयोग कोषागार अधिकारी आणि डीडीओ यांच्याकडून प्रधान महालेखापाल कार्यालयाशी सादरीकरण किंवा शंकांचे निराकरण करण्यासाठी केला जात आहे.

आहरण आणि संवितरण अधिकारी आणि कोषागार अधिकारी आमच्या कार्यालयाशी संबंधित त्यांच्या प्रश्नांचे त्वरित निराकरण करण्यासाठी या ईमेलचा वापर करू शकतात.

## ONLINE HELPDESK




Online Helpdesk mechanism has been initiated by this office whereby Treasury Officers (TOs) and Drawing & Disbursing Officers (DDOs) can refer their queries, on process related matters, by writing to the following dedicated email id :

***helpdesk.mh1.ae@cag.gov.in***

Queries received on this email shall be responded to in a timely manner.

# माहितीचे व्हिडिओ

लेखा, पेन्शन आणि जीपीएफ विभागाशी संबंधित समस्यांबद्दल डीडीओ आणि पेन्शनधारकांना शिक्षित करण्याच्या स्वतःहून केलेल्या प्रयत्नाचा भाग म्हणून आमच्या कार्यालयाच्या वेबसाइटवर एक समर्पित नॉलेज चॅनेल ठेवण्यात आले आहे. नॉलेज चॅनलमध्ये आमच्या कार्यालयाद्वारे करण्यात येणाऱ्या कार्यांशी संबंधित लहान व्हिडिओ मॉड्यूल्स/कॅप्सूल आहेत.

सुरवातीला महत्त्वाच्या कार्यांचा आढावा घेतल्यानंतर, खालील विषयांवरील मराठी आणि इंग्रजी भाषेतील पहिले काही व्हिडिओ मॉड्यूल्स/तांत्रिक कॅप्सूल आमच्या वेबसाइटवर उपलब्ध आहेत:-

(i) उपयोगिता प्रमाणपत्रे (मराठी आणि इंग्रजी भाषा) सादर करणे.
(ii) पेन्शन प्रस्ताव सादर करणे.
(iii) पेन्शन संवाद.
(iv) पेन्शन आणि लेखा विभागामधील सुधारणा आणि नाविन्यपूर्ण उपक्रमांवरील व्हिडिओ

नवीन ज्ञानाचे व्हिडिओ वेळोवेळी ऑफिसच्या वेबसाइटवर अपलोड आणि उपलब्ध केले जातात.



पेन्शन संवाद उपक्रम काय आहे आणि त्यासाठी नोंदणी कशी करावी हे समजावून सांगणारा नॉलेज व्हिडिओ पाहताना पेन्शनधारक.




निवृत्तीवेतन प्रस्ताव प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) –१, महाराष्ट्र कार्यालयाकडे पूर्ण आणि योग्य रीतीने पेन्शन प्रकरणे अग्रेषित करताना अनुसरण करावयाच्या पायऱ्या स्पष्ट करणारा मराठीतील नॉलेज व्हिडिओ.

# ई-पीपीओ


आमच्या कार्यालयाने अंतिम केलेल्या पेन्शनरी लाभांचे प्राधिकार पत्र कोषागार कार्यालय आणि पेन्शनधारकांना पोस्टाद्वारे पाठवले जातात. पीपीओ न मिळणे, पोस्टाने पत्रे मिळण्यास विलंब आदींमुळे पेन्शनधारकांना अडचणी निर्माण होत आहेत.

या समस्यांचे निराकरण करण्यासाठी आणि सेवांचा वेग वाढवण्यासाठी, आमच्या कार्यालयाने अधिदान व लेखा कार्यालय मुंबईच्या अखत्यारीत येणाऱ्या शिक्षण विभागाच्या पेन्शनधारकांसाठी 12 नोव्हेंबर 2021 पासून डिजिटल स्वाक्षरी केलेले ई-पीपीओ (इलेक्ट्रॉनिक पेन्शन पेमेंट ऑर्डर) पाठवण्यास सुरुवात केली.

निवृत्तीवेतन प्राधिकार पत्र संबंधित कोषागार कार्यालयांना ऑनलाइन पाठवले जातात आणि वेब लिंक पेन्शनधारकांना पाठवल्या जातात ज्याद्वारे ते त्यांच्या मोबाईल आणि लॅपटॉपसारख्या इलेक्ट्रॉनिक उपकरणांवर प्राधिकार पत्र डाउनलोड करून ठेवू शकतात. पेन्शनधारकांना त्यांचे पेन्शन सुरू करण्यासाठी निवृत्तीवेतन प्राधिकार पत्र पुस्तिकेची प्रत्यक्ष प्रत सादर करण्याची यापुढे आवश्यकता नाही.

17 जानेवारी 2022 पासून अधिदान व लेखा कार्यालय मुंबईच्या अखत्यारीतील महाराष्ट्र शासनाच्या सर्व विभागांना समाविष्ट करण्यासाठी ई-पीपीओ उपक्रमाचा विस्तार करण्यात आला आहे.

आर्थिक वर्ष 2022-23 मध्ये, आम्ही महाराष्ट्र राज्यातील आमच्या कार्यालयाच्या अखत्यारीतील सर्व जिल्ह्यांतील पेन्शनधारकांसाठी हळूहळू ई-पीपीओ उपक्रम विस्तारण्याचा प्रयत्न करत आहोत.



e-PPO

भारतीय लेखापरिक्षा व लेखा विभाग

**प्रधान महालेखाकार कार्यालय, (ले व ह)-I, महाराष्ट्र, मुंबई-400020**

PENSION PAYMENT ORDER

Authority No. Date :

Application No. : Sevaarth Id. : DDO Code : Series :

To,

The Treasury Officer/ Pay and Accounts Officer,

PART-I

PPO No. :
Debitable to Government of
Head of Accounts :

UNTIL FURTHER NOTICE, and on the expiration of every month, be pleased to pay to Shri/ Smt./ Kum. an amount of रु. (रु. only) Pension/ Family Pension as set out in PART-II of this order, plus the amount of dearness relief as admissible from time to time thereon, after due identification of the pensioner/ family pensioner. The payment of the Pension/ Family Pension should commence from .

In this case Retirement/ Death Gratuity रु. in lumpsum is also admitted on G.P.O. No. and Commuted Value रु. in lumpsum is admitted on C.P.O. No.

(DCRG & Commuted Value not to be paid on the basis of this order).

PART-II

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| Name of the Government servant | | | | | | | |
| Dt. of Birth | | Dt. of Appointment | | Dt. of Retirement | | Dt. of Death | |
| Class of Pension | | | | | | | |
| Post held | | | | | | | |
| Pay scale | | | | | | Aadhaar No | |
| Service in YY/MM/DD | Gross | | Non-QS | | Weightage | | Net-QS |
| Pensionable Pay | | Last Pay | | GP/LVL | | NPA | |
| Average Pay | | Avg. Emol | | Avg. GP | | Avg.NPA | |

| PENSION | | ENHANCED FAMILY PENSION | | NORMAL FAMILY PENSION | | COMMUTATION DETAILS | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| Amount | | Amount | | Amount | | Ratio/ Age on next Birthday | |
| Commuted | | From | | From | | Amount/ Percentage | |
| Reduced | | To | | To | | Commuted Value | |

*Eligible Family member in the event of Family Pension and in case of the death of the pensioner/ family pensioner the following members will be the Legal heirs of the pensioner, entitled to receive "LIFE TIME ARREARS (LTA)" of the expired pensioner if any & for any other such purpose.*

| Sr. No. | Full Name of Family Pensioner & Other Family Members/ Nominees | Eligible for FP | Relation with Pensioner | Date of Birth | *Handicapped/ Mentally disabled | Name of Guardian & Relation with Nominee | LTA share (%) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |

* MCS( Pension) Rules 1982, 116(5)-3 Para No. 2 & (Read GR of F.D. Dated 08/10/2018).

*Copy for information to :*

Sr. Accounts Officer

101, महर्षी कर्वे रोड, प्रतिष्ठा भवन, दुसरा मजला, चर्चगेट, मुंबई -400 020.
Telephone No. 022-2203 96 80, Website :https://cag.gov.in/ae/mumbai/en email : agaemaharashtra1@cag.gov.in

**ई-पीपीओचे प्रारूप**



**प्र. महालेखापाल डिजिटल स्वाक्षरी केलेल्या ई-पीपीओचा पहिला संच पेन्शनधारकाला सुपूर्द करताना**

# पेन्शन कार्यशाळा आणि अदालत

पेन्शन आणि भविष्य निर्वाह निधी प्रकरणांची अचूक आणि वेळेवर प्रक्रिया सुनिश्चित करण्यासाठी आणि पेन्शनधारकांना सुधारित सेवा देण्यासाठी आमच्या कार्यालयाच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांचा एक भाग म्हणून, आमचे कार्यालय आहरण आणि संवितरण अधिकाऱ्यांसाठी (डीडीओ) पेन्शन आणि भविष्य निर्वाह निधी  कार्यशाळा आणि पेन्शनधारकांसाठी पेन्शन अदालत राज्य सरकारच्या विविध कोषागार आणि विभागात आयोजित करते.

कार्यशाळांमध्ये पेन्शन आणि भविष्य निर्वाह निधी प्रकरणांची वेळेवर प्रक्रिया सुनिश्चित करण्यासाठी सादर करावयाच्या कार्यपद्धती आणि कागदपत्रे यांचे सादरीकरण असते. ई-पीपीओ, ऑनलाइन पेन्शन संवाद, ऑनलाइन पेन्शन आणि जीपीएफ सेवा पत्र, व्हॉईस मेल सेवा, टोल फ्री नंबर सेवा, ऑनलाइन हेल्पडेस्क, नॉलेज चॅनल व्हिडिओ आणि पेन्शनधारकांना उत्तम सेवा देऊन त्यांच्यापर्यंत पोहोचण्यासाठी आमच्या कार्यालयाने विविध उपक्रम हाती घेतले आहेत, आमच्या वेबसाइटवर ऑनलाइन हेल्पडेस्क, नॉलेज चॅनल व्हिडिओ व इतर माहिती स्पष्ट केली आहे.





पोलीस महासंचालकांच्या राज्यामधील कार्यक्षेत्रातील डीडीओंसाठी एक पेन्शन कार्यशाळा *26* एप्रिल *2022* रोजी पोलीस महासंचालक, महाराष्ट्र, मुंबई यांच्या कार्यालयात आयोजित करण्यात आली होती. कार्यशाळेचे उद्घाटन सुश्री जया भगत, प्रधान महालेखापाल *(*लेखा व अनुज्ञेयता*)* – १, महाराष्ट्र आणि श्री. अनुप कुमार सिंग, अतिरिक्त पोलीस महासंचालक *(*प्रशासन*)*, महाराष्ट्र यांच्या हस्ते झाले. कार्यशाळेला *125* डीडीओ आणि अधिकारी उपस्थित होते.

पेन्शन अदालत दरम्यान, पेन्शनधारकांच्या समस्या आमच्या कार्यालयाच्या टीमद्वारे शक्य तितक्या संयमाने ऐकल्या जातात आणि जागेवरच सोडवल्या जातात. निवृत्ती वेतनधारकांनी प्रधान महालेखापाल कार्यालय त्यांच्यापर्यंत पोहोचत असल्याबद्दल आनंद व्यक्त केला आहे आणि पेन्शन संवाद, पेन्शन आणि जीपीएफ सेवापत्र, व्हॉईस मेल सेवा, टोल फ्री नंबर सेवा, ऑनलाइन हेल्पडेस्क मेल इत्यादी, ज्याद्वारे कार्यालय त्यांना त्यांच्या घरी पेन्शन संबंधित सेवा प्रदान करते, अशा नवीन उपक्रमांबद्दल त्यांचे आभार व्यक्त केले आहेत.







*28* एप्रिल *2022* रोजी पोलीस आयुक्त कार्यालय, मुंबई येथे डीडीओ आणि पेन्शन अदालत यांच्यासाठी पेन्शन कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. कार्यशाळेचे उद्घाटन सुश्री जया भगत, प्रधान महालेखापाल *(*लेखा व अनुज्ञेयता*)*–१, महाराष्ट्र आणि श्री. राजकुमार व्हाटकर, सहपोलीस आयुक्त *(*प्रशासन*)*, मुंबई. यांच्या हस्ते झाले. या कार्यशाळेला *20* आहरण व संवितरण अधिकाऱ्यांचे *80* अधिकारी उपस्थित होते आणि पेन्शन अदालतला सुमारे *500* पेन्शनधारक उपस्थित होते.

लोकहितार्थ सत्यनिष्ठा
Dedicated to Truth in Public Interest

# प्रधान महालेखापाल ले.व.अ.- १ कार्यालय महाराष्ट्र, मुंबई - ४००० २०

निवृत्तिवेतनधारकांच्या समस्यांचे निवारण करण्यासाठी सुरु करण्यात आलेले विविध उपक्रम

## १ . पेन्शन संवाद

पेन्शन संबंधित सर्व समस्यांबाबत आता घरबसल्या करा आमच्या अधिकाऱ्यांशी व्हिडिओ कॉलवर संवाद. **Whatsapp** आणि **Zoom** कॉल साठी या लिंकवर नोंदणी करा https://cag.gov.in/ae/mumbai/en



## २. व्हॉइस मेल सेवा - २४ तास



आता आम्हाला तुमच्या समस्या कळवण्यासाठी वेळेचे कोणतेही बंधन नाही. २४ तास सेवेत असणाऱ्या ०२०-७११७७७७५ या क्रमांकावर संपर्क करून पेन्शनधारकांच्या माहितीसोबत त्यांच्या समस्या रेकॉर्ड करा. आमचे अधिकारी दोन दिवसातच समस्यांचे समाधान करण्यासाठी आपल्याशी संपर्क साधतील.

## ३. TOLL FREE क्रमांक

कार्यालयीन वेळेत या क्रमांकावर कॉल करून पेन्शन संवाद साठी नोंदणी करा अथवा आपल्या पेन्शन संबंधित समस्यांसांबद्दल थेट आमच्या प्रतिनिधींशी बोला.
संपर्क करा - १८०० २२ ००१४




## ४.नॉलेज चॅनेल




पेन्शन प्रक्रियेबाबत सुस्पष्टता आणण्यासाठी आणि उद्भवणाऱ्या संभाव्य समस्यांबद्दल मार्गदर्शन करण्यासाठी आम्ही घेऊन येत आहोत **Knowledge Channel** जिथे तुम्ही आमच्या अधिकाऱ्यांनी बनवलेले विविध मार्गदर्शनपर व्हिडिओज पाहू शकता.
लिंक: https://cag.gov.in/ae/mumbai/en/video-gallery

## आता पेन्शनचे नको टेन्शन

पेन्शन प्रक्रिये संबंधित कोणतीही शंका असल्यास कृपया इमेल- द्वारे कळवा
helpdesk.mh1.ae@cag.gov.in

लोकहितार्थ सत्यनिष्ठा

Dedicated to Truth in Public Interest


**भारतीय लेखापरीक्षण आणि लेखा विभाग**

**प्रधान महालेखापाल कार्यालय (लेखा व अनुज्ञेयता)-१,**

**महाराष्ट्र**

**दुसरा मजला, प्रतिष्ठा भवन, 101, एम.के. रोड, न्यू मरीन लाईन्स,**

**मुंबई- 400 020**

**संपर्क क्रमांक-022-22039680**

**ई-मेल- agaemaharashtra1@cag.gov.in**

**वेबसाइट- https://cag.gov.in/ae/mumbai/en**


**डाउनलोडसाठी लिंक : https://cag.gov.in/ae/mumbai/en/page-ae-mumbai-informative-booklet**

